# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक क्र. टीएएएस(युटी/सीटी)/ १० /२०१८—२०१९**

संदर्भः—१) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./४८/२००९ दिनांक ३१ जानेवारी २००९
२) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./७३/२०१० दिनांक १६ एप्रिल, २०१०
३) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./५५/२०११ दिनांक १० मार्च, २०११
४) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./९५/२०११ दिनांक ३० मे, २०११
५) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./३७७/२०११ दिनांक ८ नोव्हेंबर २०११
६) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./०१/२०१२ दिनांक २१ जानेवारी, २०१२
७) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./१२/२०१२ दिनांक २८ मे, २०१२
८) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./३७/२०१२ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३
९) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./१५/२०१४—२०१५ दिनांक १५/०९/२०१४
१०) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./८/२०१५—२०१६ दिनांक ०५/१२/२०१५.
११) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक क्र. टीएएएस(युटी/सीटी)/०४/२०१६—२०१७ दिनांक २८/११/२०१६.

**विषयः— संलग्नित महाविद्यालयांत नियमित प्राचार्य नियुक्तीबाबत.**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत मानव्य विद्या, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान तसेच आंतर विद्याशाखा या विद्याशाखांमधील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, आपापल्या महाविद्यालयात प्राचार्यांची पदे प्राधान्याने भरावीत असे विद्यापीठामार्फत उपरोक्त परिपत्रके निर्गमित करुन वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. शासन स्तरावरील विविध बैठकांमध्ये अनेकदा महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्य कार्यरत नसल्याबाबत विचारणा करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे व्यवस्थापन परिषदेच्या दि. ०६/१०/२०१८ रोजीच्या बैठकीत या विषयावर तातडीने कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

सदरबाबत मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि—२०१६ /प्र.क्र.३०/२०१६/आ.पु. कक्ष दिनांक २५ मे, २०१७ अन्वये नवीन पदनिर्मिती व पदभरती करता येणार नाही असे जरी सुचित केले होते तरीही तद्नंतर कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र संकिर्ण—२०१७/प्रक्र.१७०/मशि—५ दिनांक २३ एप्रिल २०१८ अन्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील रिक्त असलेली प्राचार्यांची पदे तसेच प्राचार्य पदाचा पाच वर्षाचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी प्राचार्यांची पदे भरण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. मात्र तरीही अनेक महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्य भरतीची प्रक्रिया न करता, प्रभारी प्राचार्यांच्या नियुक्तीबाबतचे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविले जात आहत, असे निदर्शनास आलेले आहे.

त्या अनुषंगाने अशासकिय अनुदानित महाविद्यालयांच्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना सुचित करण्यात येते की, वरिल शासन निर्णयानुसार संबंधीत सहसंचालकांकडून प्राचार्य पद भरतीकरिता ना–हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करून नियमित प्राचार्य पद भरतीसाठी विहीत पद्धतीने प्रस्ताव सादर करावा. तसेच विनाअनुदानित महाविद्यालयांनीही विहीत पद्धतीने नियमित प्राचार्य भरण्यासाठी यथोचित कार्यवाही करावी.

या अनुषंगाने, सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, ज्या महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्य पद भरलेले नाही अशा महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्यांची रिक्त पदे तातडीने व प्रथम प्राधान्याने भरण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून नियमित प्राचार्य पद भरण्यात यावे. ही सर्व कार्यवाही कुठल्याही परीस्थीतीत पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होईपर्यंत म्हणजेच जुलै, २०१९ पर्यंत करण्यात यावी. शैक्षणिक वर्ष २०१९–२०२०मध्ये व तद्नंतर नविन महाविद्यालये वगळता इतर महाविद्यालयांचे प्रभारी प्राचार्य पदांचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही व त्यामुळे उपस्थित होणारे प्रश्न व अडचणींची जबाबदारी संपूर्णपणे आपल्या संस्थेची/महाविद्यालयाची असेल याची कृपया नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी कृपया शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागात संपर्क साधावा.

दूरध्वनी क्र. ०२२–२२७०८७४१
ईमेलआयडी – concolsection@gmail.com

(दता घुगे)
उपकुलसचिव
मुंबई विद्यापीठ

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– ९-०१-२०१९.

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत मानव्य विद्या, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान तसेच आंतर विद्याशाखा या विद्याशाखांमधील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.